ISSN - 2277-7911
Impact Factor - 5.519

# YOUNG RESEARCHER

## AN INTERDISCIPLINARY DOUBLE-BLIND PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

JOURNAL INDEXING

VOL. 14 SPECIAL ISSUE 1
JANUARY 2025

8624946865
editor@yra.ijaar.co.in
www.yra.ijaar.co.in

YOUNG RESEARCHER ASSOCIATION, KOLHAPUR

| Sr.No. | Name of the Auther | Title of the research Paper |
|---|---|---|
| 1 | Dr. Ganesh Darade , Mr. Uddhav Trimbak Bade | मुलींचा जन्म व आधुनिक काळातील आर्थिक बदल आणि शिक्षण |
| 2 | Dr. Sunil Mohate | शाश्वत ग्रामीण विकासातील समस्या आणि उपाययोजना |
| 3 | Dr. Mohan Shinde | "देशाच्या आर्थिक विकासात कृषी पर्यटनाचे योगदान एक अभ्यास " |
| 4 | Dr. Pravin Aher | कृषी पर्यटन विकास |
| 5 | Dr. Vishwnath Kotkar | चलनवाढ आणि आर्थिक विकास |
| 6 | Dr. Shobha Rahane | महिला सबलीकरण गरज आणि महत्व |
| 7 | Dr. Appaso Kalel | भारतीय बँकिंग क्षेत्रामधील संधी आणि आव्हानांचा अभ्यास |
| 8 | Mr. Vikas Pawase, Ms. Sharada Pawase | महिला सक्षमीकरण आणि भारत |
| 9 | Dr. Kailas Jadhav, Ms. Vaishali Ghodake | भारतीय सेवा क्षेत्रामध्ये नील अर्थव्यवस्थेचे योगदान : एक विवेचन |
| 10 | Dr. Nitin Deshmukh | प्राचीन भारतीय ज्ञानप्रणाली व धातुशास्त्राचे महत्व |
| 11 | Dr. Ramdas Gadage, Dr. Lata Dhende | भारतातील सेवा क्षेत्राच्या निर्यातीचा अभ्यास |
| 12 | Dr. Kirankumar Thorat | " विदेश व्यापाराचा भारताच्या आर्थिक वृद्धीवर प्रभाव " |
| 13 | Dr. Gorakhnath Wakale, Mr. Ganesh Chor | " स्टार्टअप व्यवसायाचे भारतातील योगदान |
| 14 | Ms. Sonali Deshmukh | समाज आणि व्यवसायावर ई-कॉमर्सच्या प्रभावाचा अभ्यास |
| 15 | Dr. Sangita Jangid | कृषी पर्यटनातून ग्रामीण विकासाची संधी |
| 16 | Dr. Bhagwat Thakur | "माहिती तंत्रज्ञान शेती विकासासाठी वरदान" |
| 17 | Mr.D.N. Ghane | भारतीय कृषी उद्योग व रोजगार निर्मितीचा चिकित्सक अभ्यास करणे. |
| 18 | Dr. B.D. Ingwale | कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास |
| 19 | Dr. Sangita Salve Ms. Pawar Sonal Balasaheb | "आदिवासी लोकांच्या स्थलांतराच्या परिणामाचा अभ्यास करणे" |
| 20 | Mr. Nandkishor Gosavi | कृत्रिम बुद्धिमत्ता आणि बँकिंग |
| 21 | Dr. Ramesh Kashide, Mr. Sameer Kumbarkar | भारताच्या आर्थिक विकासातील असंघटित कामगारांचा सहभाग |
| 22 | Dr. Gorakshnath Sanap , Mr.Amol Khade | अहमदनगर जिल्ह्यातील सफाई कामगारांची सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास |
| 23 | Prof. Dr. Sanjiv Late , Ms. Rachana Kolape | पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय कृषी उत्पादकतेचा चिकित्सक अभ्यास |
| 24 | Dr. Gorakshnath Sanap, Ms. Nilam Kale | बॅंकिंग क्षेत्रातील आधुनिक प्रवाह |
| 25 | Dr. Hiraman Kshirsagar, Ms. Supriya Kawale | ग्रामीण भागातील महिला शेतमजुरांच्या समस्या |
| 26 | Dr. Adinath More , Mr. Balasaheb Kangane | पुणे शहर वाहतुकीत पुणे परिवहन महामंडळाचे योगदान. |
| 27 | Dr. Jaywant Bhadane, Ms. Dipali Borude | बालमाता कुपोषण, निर्मुलनासाठीच्या शासकीय योजना व एक अभ्यास |
| 28 | Dr. Phalphale Pratap, Mr. Gavade Sandesh | पर्यटन व्यवसाय व महाराष्ट्रातील रस्ते वाहतूक सुविधा यांचा तुलनात्मक अभ्यास |

AnyScanner

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
January - 2025 Vol. 14 Special Issue No. 1

# कृषी पर्यटनातून ग्रामीण विकासाची संधी

**डॉ. संगीता रामेश्वरलाल जांगीड**

*अर्थशास्त्र विभाग प्रमुख, नूतन कला, महाविद्यालय, राजापूर*
**Corresponding Author:** डॉ. संगीता रामेश्वरलाल जांगीड

**DOI - 10.5281/zenodo.14875162**

**प्रस्तावना :**

कृषी आणि पर्यटन या दोन गोष्टींच्या समन्वयातून बनलेली कृषी पर्यटन. ही पर्यटनाची नवीन संकल्पना सध्या मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे. ग्रामीण भागातील शेती, निसर्ग, पशु- पक्षी, संस्कृती आणि जीवनशैली याचे शहरी भागातील लोकांना आकर्षण वाटू लागले आहे. त्यामुळे विरंगुळा किंवा क्षणभर विश्रांती म्हणून शहरी लोक आता ग्रामीण भागाकडे पर्यटन केंद्र म्हणून पाहू लागले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील कृषी पर्यटन व्यवसायाला चालना भेटत आहे. महाराष्ट्रात आजमितीला जवळपास ७०० ते ७५० प्रयत्न केंद्रे आहेत. कमीतकमी एक एकर जागेमध्येही कृषी प्रयत्न केंद्र सुरु करता येते. कृषी पर्यटन केंद्र वै शेतकरी, कृषी सहकार संस्था, शेतकर्याषची सहकारी संस्था, अशासकीय संस्था, कृषी विज्ञान केंद्र, कृषी महाविद्यालये, कृषी विद्यापीठे, शेतकर्याकनी एकत्र येऊन तयार केलेल्या भागीदारी संस्था किंवा कंपन्या, ग्रामपंचायत, शेतकऱ्यांचे गट यांपैकी कुणीही सुरु करू शकतो. शेतीतून अधिक उत्पन्न मिळवायचं असेल तर केवळ शेती पिकांवर अवलंबून न राहता शेतीपूरक व्यवसाय सुरु केले पाहिजेत. कृषी पर्यटन हा त्यासाठी एक चांगला पर्याय आहे.

**संशोधन विषयाची उदिदष्ट्ये :**

१) कृषी पर्यटन संकल्पना अभ्यासणे.
२) कृषी पर्यटनाचे फायदे अभ्यासणे
३) कृषी पर्यटनाचा ग्रामीण विकासावरील परिणाम अभ्यासणे

**संशोधन विषयाची गृहीतकृत्य :**

१) कृषी पर्यटनामुळे ग्रामीण विकास होतो.
२) कृषी पर्यटनातून शेतकऱ्यांचीआर्थिक परिस्थिती सुधारते.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तूत शोध निबंध हा दुय्यम साधन सामुग्रीवर आधारलेला आहे. विविध संदर्भ ग्रंथ नियतकालिके, मासिके, व तज्ज्ञांचे शोध निबंध इत्यादी मधून माहितीचे संकलन करून प्रस्तुत लेख तयार करण्यात आला.

**कृषीपर्यटनाची आवश्यकता :**

आजच्या रोजच्या वेगवान जीवनात फुरसतीचा वेळ घालवण्यासाठी सुंदर निसर्गरम्य जागा असावी. या जागेत प्रदूषण, वाहनांची गर्दी, माणसांची कोंडी, यापासून एक दिवस तरी ग्रामीण भागात जाऊन तेथील वातावरणाचा आस्वाद घेता यावा, शहरी भागातील रोजच्या जीवनाला कंटाळलेले लोक आनंदासाठी ग्रामीण जीवन अनुभव घेण्यासाठी कृषी पर्यटनाची निवड करतात आणि हे आनंद लोकांना मिळावा यासाठी कृषी पर्यटनाची आवश्यकता आहे तसेच ग्रामीण भागातील जीवनशैलीचा जर विकास करायचा असेल ग्रामीण भागाचा विकास, आर्थिक परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी कृषी पर्यटन हा उत्तम पर्याय आहे अलीकडील काळात या कृषी



AnyScanner

पर्यटनाचा विकास होताना दिसत आहे. शेतीच्या हंगामी स्वरूप पाहता शेतकऱ्यांना आर्थिक मदत व्हावी यासाठी कृषी पर्यटनाची आवश्यकता आहे. कृषी पर्यटनातून ग्रामीण रोजगार आणि पायाभूत सुविधांचा विकास होऊ शकतो या विकासाच्या दृष्टीने कृषी पर्यटन हे अत्यंत गरजेचे आहे

**कृषी पर्यटन संकल्पना :**

कृषी पर्यटन म्हणजे काय तर शहरी जीवनशैलीचा कंटाळा आलेल्या लोकांनी दोन दिवस शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन राहणे व शेतकऱ्यांनी शहरी लोकांचा सशुल्क पाहुणचार, आदरातिथ्य करणे म्हणजे कृषी पर्यटन होय. कृषी पर्यटन हा शहरी पर्यटक आणि ग्रामीण शेतकरी याना आर्थिकदृष्ट्या जोडणारा एक शेतीपूरक व्यवसाय आहे. लोकांना ग्रामीण संस्कृतीची ओळख करून देण्याबरोबरच गावातील शेतकऱ्याला आर्थिक उत्पन्न रोजगार मिळवून देण्याचा दृष्टिकोन या उपक्रमामागे आहे

**कृषी पर्यटन आणि ग्रामीण विकास :**

कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास व ग्रामीण विकासातून कृषी विकास होऊ शकतो. ग्रामीण भागात जर कृषी पर्यटन विकसित झाले तर ग्रामीण भागातील सर्व सेवा सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होईल पर्यटनांमुळे ग्रामीण भागात मूलभूत सुविधा, पायाभूत सुविधा, सेवा क्षेत्रातील मूलभूत बाबी यांचा देखील विकास होऊ शकतो शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थिती सुधारणा होते कारण शेतकऱ्यांच्या मालाला पर्यटनामुळे तिथेच योग्य मागणी मिळते कृषी प्रयत्नासाठी शेतकऱ्याला विशिष्ट अशी जागा विकत घ्यावी लागत नाही आपल्या शेतात सुधारणा करून पर्यटनाची जागा तयार करावी लागते त्यामुळे आहे त्या जागेच वापर करून पैसा मिळू शकतो कृषी पर्यटनामुळे ग्रामीण भागातील सेवा सुविधांमध्ये वाढ झाल्यामुळे विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी प्राप्त होतात बँकिंग क्षेत्र हॉटेल्स व्यवसाय अशा क्षेत्रांची प्रगती ग्रामीण भागात होत असल्याने या क्षेत्रामध्ये ग्रामीण भागातील लोकांना रोजगार प्राप्त होतो. त्यामुळे ग्रामीण भागाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होते अशा पद्धतीने कृषी पर्यटनामुळे ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत होते.

**कृषी पर्यटनाचे फायदे :**

कृषी पर्यटनाच्या माध्यमातून कृषी उत्पादनांना चांगली बाजारपेठ मिळेल. परिसरातील लघुउद्योग-कुटिरोद्योगास चालना मिळेल. अशाप्रकारे कृषी पर्यटनातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी मिळेल. समजा गावात एखादी मोठी नर्सरी असेल, फळबाग असेल, प्रसिद्ध ठिकाण असेल अशा ठिकाणी पर्यटकांना फिरण्यासाठी नेल्यास ते त्याठिकाणहून वस्तू खरेदी करू शकतात. यामुळे ग्रामीण भागाचा व्यवसाय वाढते. यातून गावाचा विकास होण्यास मदत होते. ग्रामीण भागातील वस्तू शहरात जाऊन विक्री करण्यापेक्षा तीच वस्तू जर कृषी पर्यटन केंद्रावर किफायतशीर किमतीत मिळत असेल तर यातून पर्यटकांचीही आर्थिक बचत होईल तसेच शेतकऱ्यांनाही आर्थिक मदत मिळेल. गावातील काही महिलांचा बचत गट असेल तर त्यांची उत्पादने पापड, लोणचे किंवा विविध कलाकृती पर्यटन केंद्रावर विक्रीसाठी ठेवल्यास महिलांना त्यातून रोजगार उपलब्ध होऊ शकतो. याशिवाय गावातील स्थानिक लोकांच्या कलाकृती बांबूचे टोपले, सूप, नीरा मध यांसारखे खाद्यपदार्थ यांचीही विक्री पर्यटन केंद्राच्या माध्यमातून होते. यामुळे ग्रामीण भागातील लोककला, हस्तकला, खाद्य संस्कृती शहरी भागापर्यंत पोचायला मदत होते आणि गावाची लोककला, खाद्यसंस्कृती, यात्रा उत्सव, परिसरातील पर्यटन वैभव यांचे जतन व संवर्धन होते. कृषी पर्यटनाच्या माध्यामातून ग्रामीण व

शहरी भागांच्या माहितीची, ज्ञानाची देवाण-घेवाण होते. शहरी पर्यटकांना शेती व शेतीविषयक कामांची माहिती आणि त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी कृषी पर्यटन हा उत्तम पर्याय आहे. ग्रामीण जीवनाचा, संस्कृतीचा, लोककलांचा, खाद्य संस्कृतीचा त्यांना अनुभव पर्यटकांना घेता येतो. कुटुंबासोबत निवांत क्षण घालवण्याची उत्तम संधी पर्यटकांना मिळते. शहरी लोकांना शेतीत किती कष्ट करावे लागतात याची कल्पना येईल. शहरी आणि ग्रामीण भागातील दरी कमी होण्यास मदत होईल.

**निष्कर्ष :**

शेतकरी त्यांच्या शेतात पर्यटकांचे स्वागत करतात जेणेकरून ते मजा करू शकतील आणि विविध क्रियाकलापांचा आनंद घेऊ शकतील. यामुळे शेतकऱ्यांना अधिक पैसे कमविण्यास, त्यांच्या नोकऱ्यांचा अधिक आनंद घेण्यास आणि निसर्गाची आणि त्यांच्या परंपरांची काळजी घेण्यास मदत करते. कृषीपर्यटनामुळे त्यांना त्यांचे कार्य का महत्त्वाचे आहे हे समजावून सांगण्याची आणि यात वाढ कशी करावी आणि कृषी पर्यटन वाढल्या नंतर त्याचे काय फायदे होतात हे या माध्यमातून कळते.

**संदर्भ सूची:**

१) सुनील उगले (२०२४) पर्यटन अर्थशास्त्र"
२) http://prahaar.in/ कृषी-ग्रामीण पर्यटन
३) पुरोहित वसुधा (२०१६), "कृषी अर्थशास्त्र" शशिकांत पिंपळपुरे, विदया बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद.
४) www.agritourism.in/blog-post/कृषी-व-ग्रामीण पर्यटन

D-46

Shikshan Prasarak Sanstha's

Sangamner Nagarpalika Arts, D. J. Malpani Commerce and B. N. Sarda Science College (Autonomous), Sangamner, 422605

NAAC 3rd Cycle A+ Grade (CGPA 3.58), BEST COLLEGE AWARD by SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY, PUNE

# Department of Economics and Research Centre

National Conference on

## Recent Trends in Economics, Commerce, Management, Banking, Finance & Insurance

# CERTIFICAT

This is to certify that **Dr. Sangita Jangid** of **Nutan Arts College Rajapur & Sangamner** has actively participated in '**One Day National Conference on Recent Trends in Economics, Commerce, Management, Banking, Finance & Insurance**' organized by **Department of Economics and Research Centre**, Sangamner Nagarpalika Arts, D. J. Malpani Commerce and B. N. Sarda Science College (Autonomous), Sangamner on 19th January 2025. He / She has presented paper entitled **कृषी पर्यटनातून ग्रामीण विकासाची संधी**

**Prof. (Dr) Gorakshanath Sanap**
Head of Department of Economics

**Prof. (Dr) Arun H. Gaikwad**
Principal

AnyScanner